# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/०००९३**

**अपिलार्थी - श्री. प्रसाद रामचंद्र जोशी,**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्या-८),**
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (कार्या-८)**
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २९.०५.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२३ | ०३.११.२०२३ | २२.११.२०२३ | ११.०१.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०१.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार शासन निर्णय क्र. मलोआ-११२३/प्र.क्र.२४१/का-८ दि. १८.१०.२०२३ अनुषंगाने (टिपण्णी, पत्रव्यवहार विभाग यासह निर्देश पत्र) प्रत मिळणेबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थी यांनी दि. २२.११.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले की, जन माहिती अधिकारी यांना त्यांनी शुल्क भरण्याची सूचना मुदत संपल्यानंतर ५ दिवसानंतर ईमेलद्वारे केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी जन माहिती अधिकारी यांचे दि. २१.०५.२०२३ रोजी सदर करुन असे नमूद केले की, अपिलार्थी यांचा दि. २०.०१०.२०२३ रोजीचा माहिती अर्ज दि. २३.१०.२०२३ रोजी कार्यासनात प्राप्त झाला व त्यांनी दि. ०३.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासकीय शुल्क भरणा करण्याकरिता कळविले होते. अपिलार्थी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोजित केलेल्या सुनावणीस अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०१.२०२४ रोजी अपिलार्थी यांनी माहितीकरिता आवश्यक शुल्क

..२/-

कोषागारात जमा केल्याशिवाय त्यास माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे आदेश देऊन प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका योग्य आहे. अपिलार्थी यांना माहिती हवी असल्यास जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कळविलेले शासकीय शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission * Greater Mumbai *

प्रदीप व्यास 29-5-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२५**